जळगाव, दि. २७ – कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२७ करीता एम.एस्सी./एम.ए. (भूगोल) आणि एम.एस.डब्ल्यू. अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेसाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत वाढविण्यात आली आहे. यापूर्वी या दोन्ही अभ्यासक्रमांसाठी ऑनलाईन अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दि. २५ जून २०२६ पर्यंत निश्चित करण्यात आली होती.विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेल्या मागण्या तसेच अधिकाधिक पात्र विद्यार्थ्यांना प्रवेश प्रक्रियेत सहभागी होता यावे, या उद्देशाने विद्यापीठाने मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार एम.एस्सी./एम.ए. (भूगोल) अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. ३० जून २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. तसेच एम.एस.डब्ल्यू. (मास्टर ऑफ सोशल वर्क) अभ्यासक्रमासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची अंतिम मुदत दि. २८ जून २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे.संबंधित अभ्यासक्रमांमध्ये प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी मुदतवाढीचा लाभ घेत विहित मुदतीत ऑनलाईन अर्ज भरावेत, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.प्रवेश प्रक्रियेबाबतची सविस्तर माहिती, पात्रता, आवश्यक कागदपत्रे तसेच अर्ज भरण्याची प्रक्रिया विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असून विद्यार्थ्यांनी अंतिम मुदतीची प्रतीक्षा न करता वेळेत अर्ज सादर करावेत, असेही विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २७ जुन, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी